# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे — ४११०१६

(०२०)२५६५६२३४

email : ropune@dtemaharashtra.gov.in website : www.ropune.org.in

जा.क्र.तंशिविकापु/लेखा-१/२०१९/ 5172 दिनांक 11 DEC 2019

**तात्काळ**

प्रति,

प्राचार्य, शासकीय औषधनिर्माण तंत्रनिकेतन, कराड

प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन पुणे / सोलापूर / कोल्हापूर/ मिरज/ कराड/ अवसरी/ तासगांव

प्राचार्य, शासकीय दूरशिक्षण तंत्रनिकेतन, पुणे

प्राचार्य, म.रा.हॉटेल मॅनेजमेन्ट अँड केटरींग टेक्नॉलॉजी, पुणे

विषय :- सन २०१९-२० मधील खर्चाच्या पूरक मागणीबाबत.
कंत्राटी सेवा (१०) व व्यवसायिक सेवा (२८)

संदर्भ :- तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. १५/अर्थसं/पूरक मा.अधि./२०१९-२०/९७ दि.११-१२-१९

उपरोक्त संदर्भीय पत्र व त्यासोबत महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. तंसंकी-२०१९/प्र.क्र.१७७/१९/तांशि-३ दि. ०६-१२-२०१९ रोजीचे पत्र या कार्यालयास प्राप्त झालेले आहे. करिता संदर्भीय पत्राचे अवलोकन करावे व पत्रात नमूद मुद्दयांबाबत स्वयंस्पष्ट खुलासा, शासन निर्णय, करारनामा, जाहिरात व निविदा इ. कागदपत्रे या कार्यालयास दिनांक १३-१२-२०१९ पर्यंत हस्तदेय स्वरुपात तात्काळ सादर करण्यात यावीत.

सोबत - वरीलप्रमाणे

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- प्रोग्रॅमर, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना परिपत्रकात नमूद शासकीय संस्थांना ई-मेल द्वारे पाठविण्यासाठी.

D:\all folder\Certificate\cirS.docx

तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.
दुरध्वनी २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स २२६९०००७
E Mail-desk15@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : १५/अर्थसं/पूरक मा. अधि./२०१९-२०/ ८६
दिनांक : 11 DEC 2019

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर.

विषय :- सन २०१९-२० मधील खर्चाच्या पूरक मागणीबाबत.
कंत्राटी सेवा (१०) व व्यावसायिक सेवा (२८)

संदर्भ :- शासन पत्र क्र. तंसंकि-२०१९/प्र.क्र.१७७/१९/तांशि-३, दि. ६ डिसेंबर, २०१९

**महोदय,**

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सन २०१९-२० मधील अनिवार्य खर्चाकरीता पुरक मागणी शासनास सादर करण्यात आली होती. सदर पुरक मागणीच्या अनुषंगाने (१०) कंत्राटी सेवा व (२८) व्यावसायिक सेवा या उद्दिष्टांबाबत काही मुद्दे उपस्थित केलेले आहे. सदरहू शासनाचे पत्र सोबत जोडले आहे. आपल्या विभागातली सर्व शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम पदविका संस्थाची माहिती तसेच शासनाने खालील प्रमाणे उपस्थित केलेल्या मुद्दयांबाबत संस्थानिहाय सविस्तर अहवाल तयार करुन या कार्यालयास **दिनांक २०/१२/२०१९ पर्यंत सादर करण्यात यावे.**

अ) (१०) कंत्राटी सेवा :-

१) शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये बाहय यंत्रणेमार्फत शिपाई, सफाईगार, माळी, सुरक्षा रक्षक व इतर अकुशल पदांच्या सेवा घेतांना ज्या शासन निर्णयाच्या आधारे नियुक्त्या करण्यात आल्या आहेत, त्याबाबतचे शासन निर्णय, प्रशासकीय मान्यता, करारनामा, जाहिरात/ निविदा इ. कागदपत्रे.

२) कंत्राटी सेवा घेताना संबंधित प्राचार्यांनी वापरलेले निकष व सदर पदांसाठींच्या सेवा खर्चाची परिगणना कोणत्या नियमानुसार करण्यात आली आहे, याबाबतचा पदनिहाय तपशिल.

३) संबंधित प्राचार्यांनी कंत्राटी सेवा घेतांना प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे, मात्र त्यास प्रशासकीय विभागाची मान्यता घेतलेली दिसून येत नाही, तरी तंत्रशिक्षण संचालनालयाची मान्यता घेतली आहे काय? असल्यास, त्याची प्रत आहे काय? नसल्यास त्याबाबतचा खुलासा.

४) संबंधित संस्थानी कंत्राटी सेवेमार्फत जी पदे भरली आहेत ती आवश्यक होती काय? व त्यानुसार सदर पदे भरण्यात आली आहेत काय? याबाबतची शहानिशा संबंधित विभागीय कार्यालयांनी केली आहे काय? असल्यास त्याबाबतची कागदपत्रे.

५) सद्यास्थितीत तपशिलात दर्शविलेली पदे संस्थेत कार्यरत असल्याची संबंधित प्राचार्यांची प्रमाणपत्रे.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
11 DEC 2019
आवक क्र. 92882

ब) (२८) व्यावसायिक सेवा :-

१) पदविका अभ्यासक्रमांसाठी अभ्यागत अध्यापकांच्या सेवा शासनाच्या कोणत्या मापदंडानुसार घेण्यात आल्या आहेत, याबाबतचे शासन निर्णय / आदेश यांच्या प्रती.

२) संबंधित संस्थांना पदविका अभ्यासक्रमांसाठी अभ्यागत अध्यापकांच्या सेवा आवश्यक होत्या का? व त्यानुसार सदर सेवा घेण्यात आल्या आहेत काय? याबाबतची शहानिशा संबंधित विभागीय कार्यालयांनी केली आहे काय?

३) सद्यास्थितीत तपशिलात दर्शविलेली संस्थानिहाय अभ्यांगत अध्यापकांच्या सेवा घेण्यात आल्याचे संबंधित प्राचार्यांची प्रमाणपत्रे.

४) उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दिनांक १७ मार्च २०१७ च्या शासन निर्णयान्वये सदर अभ्यांगत शिक्षक निमंत्रण करण्यापूर्वी संस्थेतील संबंधित विद्याशाखेतील संबंधित शिक्षकीय तसेच प्रशासकीय पदावरील काम करत असलेल्या शिक्षकांना प्रमाणकांनुसार शैक्षणिक भार दिला आहे याची खात्री करुन घेण्यात आली आहे किंवा कसे?

आपला,

(डॉ. सुरेश सावलकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण म. रा., मुंबई.

प्रत:- प्राचार्य, सर्व शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्था यांना पुढील कार्यवाहीस्तव.

महाराष्ट्र शासन

क्र.तंसंकी-२०१९/प्र.क्र.१७७/१९/तांशि-३
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक:- ६ डिसेंबर, २०१९

प्रति,
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
३, महापालिका मार्ग,
मुंबई-४०० ००१.

आ.३०८२
१०/१२/१९
१५

विषय:- सन २०१९-२० मधील खर्चाच्या पूरक मागणीबाबत
कंत्राटी सेवा (१०) व व व्यावसायिक सेवा (२८)

संदर्भ:- आपले क्रमांक :१५/अर्थसं/पूरक मा.अधि./२०१९-२०/९५,दि.२८ नोव्हेंबर,२०१९ चे पत्र.

संदर्भाधिन पत्रान्वये प्राप्त तपशिलवार संस्थानिहाय माहितीचे अवलोकन केले असता, आपल्या संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये कंत्राटी सेवा या उद्दिष्टांतर्गत शिपाई, सफाईगार, माळी व सुरक्षारक्षक इ. पदे संस्थेस मंजूर असलेल्या पदांपैकी रिक्त असलेल्या पदांपेक्षा जास्त प्रमाणात खाजगी सुरक्षा रक्षक कार्यालय तसेच मेस्को कार्यालयामार्फत भरण्यात आल्याचे दिसून येते. तसेच सदर सेवांकरीता संस्थानिहाय केलेला खर्चामध्ये खूप तफावत आढळून आल्याचे निदर्शनास येत आहे.

तरी वर नमूद बाबींच्या अनुषंगाने आपल्या संचालनालय स्तरावर एक समिती गठीत करुन,सदर समितीमार्फत खालील मुद्दयांबाबत करुन संस्थानिहाय सविस्तर अहवाल शासनास सादर करावा:-

१) शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये बाह्य यंत्रणेमार्फत शिपाई, सफाईगार, माळी व सुरक्षारक्षक इ. अकुशल पदांच्या सेवा घेताना ज्या शासन निर्णयाच्या आधारे नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. त्याबाबतचे शासन निर्णय, प्रशासकीय मान्यता, करारनामा, जाहिरात/निविदा इ. कागदपत्रे
२) कंत्राटी सेवा घेताना संबंधित प्राचार्यांनी वापरलेले निकष व सदर पदांसाठीच्या सेवा खर्चाची परिगणना कोणत्या नियमानुसार करण्यात आली आहे याबाबतचा पदनिहाय तपशिल.
३) संबंधित प्राचार्यांनी कंत्राटी सेवा घेताना प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे. मात्र, त्यास प्रशासकीय विभागाची मान्यता घेतलेली दिसून येत नाही. तरी, तंत्रशिक्षण संचालनालयाची मान्यता घेतली आहे काय? असल्यास, त्याची प्रत आहे का? नसल्यास त्याबाबतचा खुलासा
४) संबंधित संस्थांनी कंत्राटी सेवेमार्फत जी पदे भरली आहेत ती आवश्यक होती का? व त्यानुसार सदर पदे भरण्यात आली आहेत काय? याबाबतची शहानिशा संबंधित विभागीय कार्यालयांनी केली आहे काय? असल्यास त्याबाबतची कागदपत्रे
५) सद्यस्थितीत तपशिलात दर्शविलेली पदे संस्थेत कार्यरत असल्याची संबंधित प्राचार्यांची प्रमाणपत्रे.

Shri. Yawalkar Very Urgent matter

तातडीचे

C:\Tash-3\२०१९-२०\General Letter.docx

का.क्र. १५

- तातडीने उपरोक्त सर्व मुद्यांची माहिती संस्थेकडून मागवावी.
- उपरोक्त प्रकरणी दोन वेगवेगळ्या कोणत्या तयार करावा।
one for - Contract Service & one for PRSS

२. तसेच व्यावसायिक सेवा या उद्दिष्टाखाली आपल्या संचालनालयाच्या अधिपत्याखाली शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये पदवीका अभ्यासक्रमासाठी अभ्यागत अध्यापकांच्या सेवा खर्चात मागील वर्षाच्या तुलनेत चालू आर्थिक वर्षात वाढ झाल्याचे दिसून येते. तरी त्यानुषंगिक आपल्या संचालनालय स्तरावर एक समिती गठीत करुन खालील मुद्द्यांबाबत तपासणी करुन संस्थांनिहाय सविस्तर अहवाल शासनास सादर करावा:-

१) पदविका अभ्यासक्रमासाठी अभ्यागत अध्यापकांच्या सेवा शासनाच्या कोणत्या मापदंडानुसार घेण्यात आल्या आहेत. याबाबतचे शासन निर्णय/आदेश याच्या प्रती.

२) संबंधित संस्थांना पदविका अभ्यासक्रमासाठी अभ्यागत अध्यापकांच्या सेवा आवश्यक होत्या का? व त्यानुसार सदर सेवा घेण्यात आल्या आहेत काय? याबाबतची शहानिशा संबंधित विभागीय कार्यालयांनी केली आहे काय?

३) सद्यस्थितीत तपशिलात दर्शविलेली संस्थेनिहाय अभ्यागत अध्यापकांच्या सेवा घेण्यात आल्याचे संबंधित प्राचार्यांची प्रमाणपत्रे.

४) उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.१७ मार्च, २०१७ शासन निर्णयान्वये सदर अभ्यागत शिक्षक निमंत्रित करण्यापूर्वी संस्थेतील संबंधित विद्याशाखेतील संबंधित शिक्षकीय तसेच प्रशासकीय पदावरील काम करत असलेल्या शिक्षकांना प्रमाणकांनुसार शैक्षणिक भार दिला आहे याची खात्री करुन घेण्यात आली आहे किंवा कसे?

तरी पत्रात नमूद मुद्यांच्या खुलाश्यासह प्रस्ताव शासनास त्वरीत सादर करावा.

(मनाली सामंत)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन